ISSN : 2278-4632

# JUNI KHYAT

# जूनी ख्यात

इतिहास, कला एवं संस्कृति की शोध पत्रिका

A Peer-Reviewed and Listed in UGC Care List



# JUNI KHYAT

# जूनी ख्यात

(सामाजिक विज्ञान; कला एवं संस्कृति की शोध पत्रिका)

वर्ष : 11 ● अंक 4 No.3

APRIL - 2021

**A Peer-Reviewed and Listed in UGC CARE List**

**ISSN 2278-4632**

संपादक

**डॉ. बी. एल. भादानी**

प्रोफेसर

प्रबंध संपादक

**श्याम महर्षि**

**मरुभूमि शोध संस्थान**

**संस्कृति भवन**

**एन.एच. 11, श्रीडूँगरगढ़ (बीकानेर) राजस्थान**

Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-04 No.03 April 2021

# सामाजिक तत्त्वज्ञान – आधुनिक संदर्भ

डॉ. किरण सावे सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर :: asthkiran@reddifmail.com

समग्र मानवी समाज हा सामाजिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय आहे. सामाजिक तत्त्वज्ञानामध्ये मानवाशिवाय इतर प्राण्यांचा विचार केला जात नाही. सामाजिक तत्त्वज्ञान हे सामाजिक संबंधातील वास्तव व मूल्ये याचे निर्धारण करते. तसेच मानवी समाजाचा भूत, भविष्य आणि वर्तमान अशा तीनही आवस्थांच्या संदर्भात विचार करते. ते सामाजिक प्रगतीचे मुल्यमापन शाश्वत मुल्यांच्या आधारे करते.

सामाजिक तत्त्वज्ञानातील प्रश्नांमध्ये सामाजिक प्रगतीचा प्रश्न सर्वाधिक महत्त्वाचा मानला जातो. सामाजिक प्रगतीच्या कल्पनेत सामाजिक परिवर्तनाची कल्पना सामावलेली आहे. परिवर्तनाच्या अभावी प्रगती संभवत नाही. समाजामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती घडून येण्यासाठी आवश्यक ते परिवर्तन व्हावे लागते. परंतु प्रत्येक परिवर्तन म्हणजे प्रगती नव्हे समाजिक परिस्थितीतील प्रत्येक परिवर्तन, बदल किंवा स्थित्यंराला सामाजिक प्रगती म्हणता येणार नाही.

प्राचीन काळापासून मानवी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास परिवर्तन हा मानवी समाजाचा मुलभूत धर्म आहे, असे आढळून येते. मानवी समाज हा अनेक अवस्थांमधून संक्रमित झाला आहे. तो बदललेला आहे आणि सतत बदलतही आहे. रानटी – भटक्या अवस्थेपासून मानवी समाजाने आपला मार्ग काढून वाटचाल केली आहे. समाजात परिवर्तन झाले आहे ही बाब निश्चितपणे सत्य आहे. परंतु परिवर्तनाच्या प्रत्येक अवस्थेत समाजाने प्रगती साधली की नाही. हा मात्र मतभेदाचा विषय होऊ शकतो. म्हणूनच परिवर्तनाबरोबरच प्रगतीच्या स्वरूपाचाही विचार करणे आवश्यक आहे. आजचा आपला समाज विकास प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण अवस्था आहे. आजच्या आपल्या समाजाने बऱ्याच प्रमाणात प्रगती साधली आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. समाजशास्त्र आणि सामाजिक तत्त्वज्ञानालाही ते मान्य आहे.

सामाजिक तत्त्वज्ञानात प्रगतीच्या संकल्पनेचा विचार एका विशिष्ट दृष्टिकोनातून केला जातो. या दृष्टिकोनानुसार प्रगतीचा विचार हा ध्येयाच्या कल्पनेवर आधारलेला आहे. सामाजिक प्रगती ही सामाजिक मूल्यांवर व ध्येयावर अवलंबून असते. सामाजिक परिवर्तन हे प्रगतीच्या मार्गाने होत आहे की समाज अधोगतीकडे झुकत आहे, ही गोष्ट त्या समाजाने कोणती मूल्ये स्विकारली आहेत यावर अवलंबून असते. सामाजिक मूल्यांच्या व ध्येयांच्या अभावी सामाजिक प्रगतीचा विचार करणे अगदी अशक्य आहे म्हणजेच सामाजिक प्रगती ही सामाजिक मूल्यांच्या व ध्येयांच्या सफलतेवर अवलंबून असते किंबहुना ती तशी असावयास हवी. परिवर्तन व प्रगती यातील हा फरक लक्षात घेतला तर केवळ परिवर्तन म्हणजे प्रगती का नाही याचा उलगडा होतो हा फरक लक्षात घेऊनच सामाजिक तत्त्वज्ञानात सामाजिक सुधारणांचा विचार


Copyright @ 2021 Author

 ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-04 No.03 April 2021

करावा लागतो. या ठिकाणी समाजाची पुरातनता किंवा आधुनिकता हा मुद्दा अगदीच गौण स्वरूपाचा आहे. खिस्तपूर्व काळातील एखादा समाज पुरोगामी वृत्तीचा व प्रगतीशील असू शकेल, तर २० व्या शतकातील एखादा समाज प्रतिगामी वृत्तीचा असू शकतो. त्यामुळे प्रगतीचे लक्षण निश्‍चित करून सामाजिक प्रगतीची दिशा ठरविणे आवश्यक असते.

जेव्हा आपण प्रगतीचा विचार करतो. तेव्हा आपल्या डोळ्यासमोर एखादे विशिष्ट सामाजिक मूल्य असते. उदा. वैयक्तिक मत स्वातंत्र्य हे जर आपले मूल्य असेल तर ज्या समाजात वैयक्तिक मतस्वातंत्र्य आहे तो समाज प्रगत असे आपण मानू शकतो. अशा प्रकारे विविध मूल्यांच्या निकषांच्या आधारे आर्थिक, राजकीय, नैतिक इ. विविध क्षेत्रातील प्रगतीचे मोजमाप करता येणे आहे. अंतिम मूल्ये व ध्येय प्रत्यक्ष आचरणात आणण्यात समाज कितपत यशस्वी झाला आहे यावर प्रगती अवलंबून असते.

प्रत्येक समाजाचे काही विशिष्ट प्रकारचे प्रश्न असतात. समाज जितका सुधारलेला असेल, तितके त्या समाजातील प्रश्न अधिकाधिक बिकट व गुंतागुंतीचे असू शकतात. आजचा मानवी समाज हा बराच संमिश्र व संकीर्ण बनलेला आहे. या समाजासमोर अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. म्हणूनच परिवर्तनशील समाजाच्या ध्येयाचे स्वरूप निश्‍चित करून, गुंतागुंतीच्या परिस्थितीत योग्य ते परिणामकारक बदल घडवून आणणे ही फार जबाबदारीची, जोखमीची कामगिरी आजचा समाज तत्त्वज्ञानासमोर आहे.

लोकशाही हे अत्यंत महत्त्वपूर्ण सामाजिक मूल्य आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुत्त्व ही लोकशाहीची आधारतत्त्वे आहेत. बंधुभावांच्या अभावी खरी सामाजिक एकात्मता निर्माण होणे अशक्य आहे. बंधुभाव या सामाजिक ऐक्याचा पाया आहे. विश्वबंधुत्वाची भावना मानवी समतेवर उभी असते. समान संधी, समान न्याय, सम विभागणी असे समतेचे अनेक अर्थ संभवतात. ज्या समाजाची उभारणी न्याय समतेवर झालेली नाही, त्या समाजात सर्वांना समान संधी लाभेल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. व्यक्ती स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा आहे. परंतु स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. ज्या स्वातंत्र्यांची आपण अभिलाषा धरतो त्याची इतरांनाही अपेक्षा असते याची जाणीव प्रत्येक न्यायप्रिय माणसाला असली पाहिजे. परंतु विद्यमान लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकशाहीचा मंत्र विसरून केवळ तंत्र सांभाळण्याचा प्रयत्न होतांना दिसत आहे. लोकशाही ही केवळ एक राज्यपद्धती नाही तर ती एक विचारांची दिशा आहे. हुकूमशाही पेक्षा लोकशाही निश्‍चितपणे श्रेष्ठ असली तरी आज जगात प्रचलित असलेली लोकशाही व्यवस्था, नागरी स्वातंत्र व कल्याणाचे ध्येय गाठण्यास बरीच अयशस्वी ठरली आहे. लोकशाहीची यशस्विता शिक्षणाचा प्रसार, सामान्य जनतेतील राजकीय व सामाजिक जागृती, आर्थिक स्वातंत्र्य आणि उच्च मानवी ध्येय या महत्त्वपूर्ण घटकांवर अवलंबून असते.

 Copyright @ 2021 Author

सामाजिक ध्येय आणि प्रगती यांचा अत्यंत निकट संबंध आहे. या ध्येय सिद्धीसाठी मानवाला सतत प्रयत्नशील असावे लागते. तरीही हे ध्येय पूर्णपणे कधीही साध्य होत नाही. त्यामध्ये काहीतरी अपूर्णता राहतेच. सामाजिक जीवनामध्ये जसजशी आदर्श परिस्थिती निर्माण होते, त्याचप्रमाणे सामाजिक प्रगतीचा पल्ला गाठला जातो ही आदर्श सामाजिक परिस्थिती निर्माण करण्याची शक्ती व शक्यता सामाजिक घटकांत असली पाहीजे. अन्यथा सामाजिक ध्येयाला काही अर्थ राहणार नाही. उद्योग, कुटूंब व शिक्षण या प्रमुख सामाजिक संस्थामध्ये न्याय प्रतिष्ठापना करण्यात समाज जितका यशस्वी होईल त्याचप्रमाणे त्या समाजाने प्रगती साधली असे म्हणता येईल.

सामाजिक तत्त्वज्ञान ही २०व्या (विसाव्या) शतकात विकसित झालेली तत्त्वज्ञानाची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. पाश्चात्य सामाजिक विचारावर प्लेटो, ॲरीस्टॉटल यांच्या विचारांचा मोठा प्रभाव दिसून येतो. संपूर्ण पाश्चात सामाजिक विचारावर ग्रीक सामाजिक विचार सारणीचा ठसा उमटलेला दिसतो. अलीकडच्या काळात पाश्चिमात्य सामाजिक विचारांमध्ये विविधता आढळून येते. सतत नवनवीन कल्पनाच्या शोधातून सामाजिक विचारातील विविधतेची अभिव्यक्ती झालेली दिसून येते अनेक तत्त्वज्ञानी सामाजिक समस्यांचे तात्त्विक विश्लेषण करून समाजाच्या तात्त्विक अधिष्ठानाकडे लक्ष वेधले आहे.

सामाजिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय मानव आणि संपूर्ण मानवी समाज हा आहे. त्यामूळे समाज ज्या घटकाने बनलेला आहे. त्या सर्व घटकांचा अभ्यास ही सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याप्ती ठरते. समाजाची अनेक अंगे असतात. विवाह संस्था, कुटूंब संस्था, वंश, जाती, धर्म, राज्य इत्यादी सर्व घटकांचा मिळून समाज बनत असतो. या सर्व घटकांचे समाजातील महत्त्व यांचे स्थान, कार्ये, प्रकार, उद्दीष्टे, काळाच्या संदर्भात त्यांचा विचार, उपयुक्तता इत्यादी विचार ही सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याप्ती ठरते.

व्यक्तीच्या जशा अवस्था असतात तशाच समाजाच्यासुद्धा अवस्था असतात. समाजाच्या जन्म – मृत्यूबद्दल अंदाज केले जातात. समाज लयाला जातो की काय? ह्यावर विचार मंथन होते. या सर्वाचा विचार ही सुद्धा सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याप्ती आहे. कुटूंबव्यवस्था मोडकळीस आली आहे. शिक्षणाचे स्वरूप बदलले पाहीजे किंवा विवाहसंस्थेचे स्वरूप बदलले आहे, अशा उद्‌गारातून सामाजिक परिवर्तनाचे वेध लागतात. मूल्यांची पुनर्तपासणी करण्याची आवश्यकता वाटू लागते. समाज, संस्था, संघटना, शासन व्यवस्था इत्यादींची आदर्शानुरूप तपासणी होते. जे उच्च स्वरूपाचे आदर्श आहेत त्यांचे समाजात अस्तित्त्व कायम कसे राहील? या सर्व बाबींचा विचार सामाजिक तत्त्वज्ञानात केला जातो.

थोडक्यात समाज, समाजातील विविध संस्था, त्यांची मूल्ये, स्थान, श्रेणी, भवितव्य जुने टाकून नवीन स्विकारण्याची प्रवृत्ती या सर्व घटकांचा अभ्यास सामाजिक तत्त्वज्ञानामध्ये केला जातो.

 **Copyright @ 2021 Author**

ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-04 No.03 April 2021

विविध महत्त्वपूर्ण सामाजिक संस्थामध्ये विसाव्या व एकविसाव्या शतकात निर्णायक बदल झाले आहेत. तसेच या संकल्पनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला गेला आहे. विसाव्या शतकापूर्वी कुटूंब, विवाह, शिक्षण, धर्म, राज्य या सर्व महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था एकाधिकारशाहीवर आधारलेल्या होत्या. या सर्व व्यवस्थांमधून लोकशाहीवादी दृष्टिकोन नव्हता. प्रामुख्याने आधीच्या काळातील या सर्व व्यवस्था एकसत्ताक पद्धतीनुसार चालत असत.

आधुनिक काळात लोकशाही एक जीवन मूल्य म्हणून स्वीकारले आहे. त्यामुळे या जीवन मूल्यांचा परिणाम आणि प्रभाव समाजातील विविध महत्त्वपूर्ण संस्थांवर पडलेला दिसून येतो. पूर्वी विवाहसंस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि आता त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन यामध्ये आमूलाग्र स्वरूपाचा फरक पडला आहे. विवाह संस्थेमध्ये करारात्मक विवाह, समलिंगी विवाह, लीव इन रिलेशनशीप इत्यादी अनेक बदल झालेले दिसून येतात. कुटूंबसंस्थेमध्ये विभक्त कुटूंबाबरोबरच गे, लेस्बियन, एक पालक कुटूंब इत्यादी प्रकारची कुटूंबव्यवस्था उदयास आली आहे आणि अनेक ठिकाणी अशा पद्धतीच्या कुटूंबव्यवस्थेचा स्वीकारही झालेला दिसून येतो. भिन्नलिंगी व्यक्तिमधील लैंगिक आकर्षण हे सुद्धा नैसर्गिक असू शकते आणि निसर्गाने त्यांना जो हक्क दिलेला आहे, तो आपण स्वीकारला पाहीजे, हे आता मान्य होवू लागले आहे.

पूर्वी धार्मिक फतवे किंवा धर्मगुरूद्वारे दिल्या जाणाऱ्या धार्मिक आज्ञा सर्वासाठी अनिवार्य असत, कोणाचाही विरोध सहन केला जात नसे. किंबहुना विरोध झालाच तर तो मोडून काढला जात असे. आता मात्र धार्मिक व्यवहाराच्या दृष्टिने एक प्रकारची उत्क्रांती होतांना दिसत आहे. धर्म हे माझ्या विकासाचे साधन आहे, असे जर व्यक्तिला वाटत तर तीला मुभा आहे. धार्मिक बाबी व्यक्तिवर बंधनकारक नाहीत. त्यामुळे जर धार्मिक बाबींचा अतिरेक किंवा धार्मिक बाबी अनिवार्य केल्या जात असतील, तर त्याला उत्स्फूर्तपणे विरोध होत आहे, म्हणजेच धर्माच्या कार्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

राज्याचे बदललेले कार्य, लोकशाहीचे सार्वत्रिकरण आणि साम्यवादी विचारांची पीछेहाट इत्यादी बदलांच्या पार्श्वभूमीवर राज्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. राज्याने व्यक्तिच्या व्यक्तीगत जीवनात हस्तक्षेप करू नये असे मत व्यक्त होवून राज्याच्या कार्याची सीमारेषा निश्चित करण्याचा प्रयत्न होत आहे. इतर शासन व्यवस्थांच्या तुलनेत लोकशाही शासनव्यवस्था अधिक योग्य मानली जाते. कारण त्यामध्ये लोकांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग असतो आणि या व्यवस्थेत व्यक्तीस्वातंत्र जपणे शक्य असते. आज राज्याच्या कार्याचे स्वरूप पूर्णपणे बदललेले आहे. बाह्य आक्रमणापासून संरक्षण आणि अंतर्गत सुव्यवस्था या कार्याच्या पलीकडे राज्याने सर्वसामान्य कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली दिसते.


Copyright @ 2021 Author

ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-04 No.03 April 2021

शिक्षणाच्या बाबतीत पारंपारिक शिक्षण पद्धतीऐवजी व्यावसायिक शिक्षणावर भर दिला जात आहे. शिक्षणामुळे सर्वसामान्य लोकांच्या जीवनमानात मोठ्य प्रमाणात बदल झाला आहे हे नाकारता येणार नाही. किंबहुना शिक्षण हा घटक सामाजिक प्रगतीसाठी मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरला आहे, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. शिक्षण विषयक अभ्यासक्रम हे राज्याने किंवा शिक्षण व्यवस्थेने न ठरविता त्याबाबतची स्वायत्तता दिली गेली पाहीजे हा विचार आज मान्य झाला आहे आपला कल, आवड, क्षमता आणि त्यानुसार निवड याबाबत सहजगता निर्माण झाली आहे. आपल्या प्रगतीसाठी कोणता अभ्यासक्रम निवडावा याचे स्वातंत्र्य व्यक्तिला प्राप्त झाले आहे.

न्याय, स्वातंत्र, समता या महत्त्वपूर्ण सामाजिक मूल्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये बदल झाला आहे. न्याय ही सामाजिक तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली जाते. न्याय म्हणजे समता आणि न्याय म्हणजे साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप अशा प्रकारचे प्रतिपादन विचारवंतांनी केले आहे. त्यांच्यामते अन्यायमूलक समाजात स्वातंत्र व समता या संकल्पना निरर्थक आहे. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत राजकिय, सामाजिक व आर्थिक समानतेची कल्पना अभिप्रेत आहे. सामाजिक न्यायाच्या तत्त्वाकडे समाज परिवर्तनाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून पाहीले जाते.

स्त्रीवाद ही विसाव्या शतकातील सामाजिक परिस्थितीवर प्रभाव टाकणारी आणखी एक महत्त्वपूर्ण सामाजिक चळवळ आहे. पुरूषांच्या जोडीने स्त्रीयांच्या समतेचा धरलेला आग्रह म्हणजे स्त्रीवाद असे स्त्रीवादाचे थोडक्यात सार सांगता येईल. स्त्रीवादी चळवळीमुळे स्त्रीयांना आत्मभान प्राप्त झाले आणि संपूर्ण समाजव्यवस्थेकडे पाहण्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन विकसित झाला. स्त्रीवादी चळवळीमुळे लिंग समानतेचा विचार रूजण्यास मोठी मदत झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात सर्वत्र शांतता प्रस्थापनेच्या दिशेने मोठ्या प्रमाणात प्रयत्न झालेले दिसून येतात. त्यानंतर गेल्या ७० वर्षात महायुद्ध जरी झाले नसले तरी, विविध देशामध्ये शसस्त्र हिंसक संघर्ष तसेच आपआपले हितसंबंध जपण्यासाठी सत्तासंघर्ष निर्माण झालेले दिसून येतात. जग आज दहशतवादाच्या समस्येने ग्रासलेले आहे. अण्वस्त्रसज्ज देशांमधील संघर्ष आणि वाद जागतिक शांतता धोक्यात आणू पाहत आहेत. या पार्श्वभूमीवर अण्वस्त्रसज्ज अशा कोणत्याही दोन देशांमध्ये युद्धाची सुरूवात होणे जगाच्या दृष्टिने अतिशय धोक्याचे ठरू शकते. विशेष तः ज्या देशांमध्ये हुकूमशाही आहे किंवा सत्ता लष्कराच्या हातामध्ये आहे, अशा देशांमध्ये युद्धाविषयीचा निर्णय राजकिय नेत्यांच्या हाती नसतो. युद्धतज्ञांनी युद्धाविषयीचा निर्णय हा लष्कराच्या हाती असता कामा नये, तो राजकिय नेत्यांच्या हाती असला पाहिजे, अशा प्रकारचे मत व्यक्त करून राजकिय उद्दिष्टे ही सामरिक उद्दिष्टापेक्षा वरचढ असली पाहीजेत असे प्रतिपादन केले आहे.


Copyright @ 2021 Author

सामाजिक दृष्टिकोनातून असे विविध प्रकारचे महत्त्वपूर्ण बदल २० व्या आणि २१ व्या शतकात झालेले दिसून येतात. त्यामधून सामाजिक तत्त्वज्ञानाच्या चिंतनाला वेळोवेळी एक वेगळी दिशा मिळालेली आढळून येते.

## संदर्भ :

१. Dr. Vatsyayan, (1976 – 77), Social Philosophy, Pages 250, 2nd Edition, Publisher Kedarnath Ramnath, Meerut,
२. चौधरी पी. डी., (१नाव्हेंबर २००८) तत्त्वज्ञान : स्वरूप व समस्या, पृष्ठ १९६, विद्याप्रकाशन, नागपुर,.
३. धर्माधिकारी हेमचंद्र, सामाजिक तत्त्वज्ञानाची मुलत्त्वे, पृष्ठ १७७.
४. आगलावे प्रदीप (२००९), भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपुर.
५. कदम विकास, शिंदे सुखदेव, कांबळे रविराज (२०१४), महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास (स. १८१८ ते १९६०), अरूणा प्रकाशन, लातूर.
६. काचोळे दा. धो. (१९९०) समाजव्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद.
७. जोशी बी. आर. (२००८), समाजशास्त्र संक्षिप्त ज्ञानकोश, डायमंड प्रकाशन, पुणे.
८. सरदेसाई एस. जी., भारतीय तत्त्वज्ञान : वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, लोकवाङ्मय गृह.
९. पाटील विश्वास, फ्रेडरिक निल्से :जीवन आणि तत्त्वज्ञान, पद्गंधा प्रकाशन.
१०. बर्न्स एमिल, मार्क्सवाद म्हणजे काय?, लोकवाङ्मय गृह.
११. दीक्षित श्रीनिवास, भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन, पुणे.
१२. कठारे अनिल, महाराष्ट्रातील राजकिय व सामाजिक चळवळीचा इतिहास, विद्या बुक्स, नागपुर.

 Copyright @ 2021 Author